स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव

महाराष्ट्र शासन
समाज कल्याण आयुक्तालय, 3 चर्च पथ, महाराष्ट्र राज्य, पुणे 1.
दूरध्वनी क्र .20-26122752 ईमेल -sakalyanpuneest@gmail.com

**वाचा** १. सामान्य प्रशासन विभाग, शासन निर्णय क्र. एसआरव्ही-१०८८/प्र.क्र.११/८८/१२, दि.२१.२.१९९४
२. सामान्य प्रशासन विभाग, शासन निर्णय क्र. एसआरव्ही-१०९५/प्र.क्र.१/९५/१२, दि.८.६.१९९५
३. सामान्य प्रशासन विभाग, शासन निर्णय क्र. एसआरव्ही-१०९५/प्र.क्र.३३/९५/१२, दि.१.११.१९९५
४. सामान्य प्रशासन विभाग, शासन निर्णय क्र.एसआरव्ही- १०९६/ प्र.क्र.१/ ९५/१२,दि .२०.३.१९९७
५. वित्त विभाग शासन निर्णय क्र. वेतन-११९९/प्र.क्र.२/९९/सेवा-३, दि. २०.७.२००१
६. वित्त विभाग शासन निर्णय क्र. वेपूर-१२०९/प्र.क्र.६९/९९/सेवा-९, दि. २९.४.२००९
७. वित्त विभाग शासन निर्णय क्र. वेतन-११०९/प्र.क्र.४३/सेवा-३, दि. ३१.८.२००९
८. वित्त विभाग शासन निर्णय क्र. वेतन-११०९/प्र.क्र.४४/सेवा-३, दि. १.४.२०१०
९. वित्त विभाग शासन निर्णय क्र. वेतन-११०९/प्र.क्र.४१/सेवा-३, दि. ५.७.२०१०
१० वित्त विभाग शासन निर्णय क्र. वेतन-११११/प्र.क्र. ८ /सेवा-३, दि. १ जुलै २०११
११ वित्त विभाग शासन निर्णय क्र. वेपूर-१२०९/सुधारणा-८/सेवा-३, दि. ९.१२.२०११
१२ वित्त विभाग शासन निर्णय क्र. वेपूर-१२०९/सुधारणा-८/सेवा-३, दि. ११.०५.२०१७
१३ " सुधारित सेवाअंतर्गत आश्वासित प्रगती योजना " बैठकीचे इतिवृत्त दि. १.११.२०२१

*****

क्र. सकआ/आस्था-१/सकनि/सुआप्रयो/२०२१-२२/का-६/ १२२८ पुणे, दिनांक : १२/०४/२०२२

## -: आदेश :-

शासन सेवेत " गट - क " संवर्गात काही ठिकाणी पदोन्नतीच्या संधी उपलब्ध नाहीत तर काही ठिकाणी अशा संधी उपलब्ध असल्यातरी पदोन्नती मिळण्यास प्रदिर्घ कालावधी लागतो. त्यामुळे आलेली कुंठीतता घालविण्यासाठी दिनांक १ ऑक्टोबर ,१९९४ पासून कालबध्द पदोन्नती योजना लागू करण्यात आली. सदर कर्मचारी वृंदाचे हित लक्षात घेवून संदर्भीय शासन निर्णय क्र. २ अन्वये " गट - क " मधील पदधारकांना १२ वर्षाच्या नियमित सेवेनंतर त्यांचे पदोन्नती साखळीतील वरच्या पदावरील वेतनश्रेणी देण्याचा निर्णय शासनाने घेतला आहे. ज्या कर्मचाऱ्यांना पदोन्नती साखळीतील पदावर पदोन्नतीसाठी पद अस्तित्वात नाही अशा कर्मचाऱ्यांना देखील शासन निर्णय दि. ८/४/१९९५ सोबतच्या परिशिष्ठात दर्शविल्यानुसार वरिष्ठ वेतनश्रेणी देण्यात आली आहे.

तसेच संदर्भात नमुद केलेल्या शासन निर्णयातील तरतूदीनुसार समाज कल्याण आयुक्तालयाच्या आस्थापनेवरील "गट - क" संवर्गातील समाज कल्याण निरीक्षक /सेवानिवृत्त समाज कल्याण निरीक्षक यांना सतत व नियमित १२ वर्षे व पहिल्या लाभानंतरची १२ वर्षे सेवा पुर्ण झालेल्या कर्मचाऱ्यांना " **प्रथम कालबध्द /**

दुसऱ्या सुधारित सेवाअंतर्गत आश्वासित प्रगती योजनेचा लाभ" मंजुरी बाबत संदर्भ क्र.१३ अन्वये पार पडलेल्या पदोन्नती समितीच्या बैठकीतील निर्देशानुसार ज्या संबंधितांची कागदपत्रे अप्राप्त होती अश्या संबंधितांकडून कार्यालय प्रमुखाकडून आवश्यक अशी कागदपत्रे प्राप्त झालेली आहेत. ज्या खालील नमूद केलेल्या समाज कल्याण निरीक्षकांना" प्रथम कालबध्द / दुसऱ्या सुधारित सेवाअंतर्गत आश्वासित प्रगती योजनेचा लाभ"मंजूर करण्यात येत आहे.

## पहिली कालबध्द पदोन्नती योजनेसाठी पात्र समाज कल्याण निरीक्षक

**विद्यमान वेतनश्रेणी रू.१४००-४०-१८००-दरो-५०-२३००**

**लाभाच्या दिनांकापासून अनुज्ञेय असलेली वरिष्ठ वेतनश्रेणी १६४०-६०-२६००-दरो-७५-२९००**

| अनु क्र | कर्मचाऱ्याचे नाव | सेवेत रुजू झाल्याचा दिनांक | या संवर्गात आल्याचा दिनांक | प्रथम कालबध्द पदोन्नती अनुज्ञेय लाभाचा दिनांक |
|---|---|---|---|---|
| १ | श्री.व्ही.एल.पवार | ०६.७.१९७४ | ९.१२.१९८२ | १.१०.१९९४ |

## दुसऱ्या आश्वासित प्रगती योजनेसाठी पात्र समाज कल्याण निरीक्षक

**विद्यमान वेतनश्रेणी वेतनबॅन्ड (पीबी २) रु. ९३००-३४८००, ग्रेड पे रु. ४३०० आहे.**

**लाभाच्या दिनांकापासून अनुज्ञेय असलेली वरिष्ठ वेतनश्रेणी वेतनबॅन्ड (पीबी २) रु.९३०० - ३४८०० ग्रेड पे रु.४४००**

| अनु क्र | कर्मचाऱ्याचे नाव | सेवेत रुजू झाल्याचा दिनांक | या संवर्गात आल्याचा दिनांक | प्रथम कालबध्द पदोन्नती अनुज्ञेय लाभाचा दिनांक | दुसरी कालबध्द पदोन्नती अनुज्ञेय लाभाचा दिनांक |
|---|---|---|---|---|---|
| १ | श्री.सी.वाय.जाधव | १९.१२.१९९१ | १९.१२.१९९१ | १९.१२.२००३ | १९.१२.२०१५ |
| २ | श्री.व्ही.एल.पवार | ०६.७.१९७४ | ९.१२.१९८२ | १.१०.१९९४ | १.१०.२००६ |

| अनु क्र | कर्मचाऱ्याचे नाव | सेवेत रुजू झाल्याचा दिनांक | या संवर्गात आल्याचा दिनांक | प्रथम कालबध्द पदोन्नती अनुज्ञेय लाभाचा दिनांक | दुसरी कालबध्द पदोन्नती अनुज्ञेय लाभाचा दिनांक | शा.नि.दि.२.३.२०१९ नुसार प्रत्यक्ष दुसऱ्या लाभाचा अनुज्ञेय दिनांक |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | श्री.डी.एल.बोरसे | १३.६.१९८५ | २३.५.१९९४ | २३.५.२००६ | २३.५.२०१४ | १.०१.२०१६ |

स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव

महाराष्ट्र शासन
समाज कल्याण आयुक्तालय, 3 चर्च पथ, महाराष्ट्र राज्य, पुणे 1.
दूरध्वनी क्र.20-26122752 ईमेल -sakalyanpuneest@gmail.com

वाचा १. सामान्य प्रशासन विभाग, शासन निर्णय क्र. एसआरव्ही-१०८८/प्र.क्र.११/८८/१२, दि.२१.२.१९९४
२. सामान्य प्रशासन विभाग, शासन निर्णय क्र. एसआरव्ही-१०९५/प्र.क्र.१/९५/१२, दि.८.६.१९९५
३. सामान्य प्रशासन विभाग, शासन निर्णय क्र. एसआरव्ही-१०९५/प्र.क्र.३३/९५/१२, दि.१.११.१९९५
४. सामान्य प्रशासन विभाग, शासन निर्णय क्र.एसआरव्ही- १०९६/ प्र.क्र.१/ ९५/१२,दि .२०.३.१९९७
५. वित्त विभाग शासन निर्णय क्र. वेतन-११९९/प्र.क्र.२/९९/सेवा-३, दि. २०.७.२००१
६. वित्त विभाग शासन निर्णय क्र. वेपूर-१२०९/प्र.क्र.६९/९९/सेवा-९, दि. २९.४.२००९
७. वित्त विभाग शासन निर्णय क्र. वेतन-११०९/प्र.क्र.४३/सेवा-३, दि. ३१.८.२००९
८. वित्त विभाग शासन निर्णय क्र. वेतन-११०९/प्र.क्र.४४/सेवा-३, दि. १.४.२०१०
९. वित्त विभाग शासन निर्णय क्र. वेतन-११०९/प्र.क्र.४१/सेवा-३, दि. ५.७.२०१०
१० वित्त विभाग शासन निर्णय क्र. वेतन-११११/प्र.क्र. ८ /सेवा-३, दि. १ जुलै २०११
११ वित्त विभाग शासन निर्णय क्र. वेपूर-१२०९/सुधारणा-८/सेवा-३, दि. ९.१२.२०११
१२ वित्त विभाग शासन निर्णय क्र. वेपूर-१२०९/सुधारणा-८/सेवा-३, दि. ११.०५.२०१७
१३ " सुधारित सेवाअंतर्गत आश्वासित प्रगती योजना " बैठकीचे इतिवृत्त दि. १.११.२०२१

*****

क्र. सकआ/आस्था-१/सकनि/सुआप्रयो/२०२१-२२/का-६/ १२३० पुणे, दिनांक : १२/०४/२०२२

## -: आदेश :-

शासन सेवेत " गट - क " संवर्गात काही ठिकाणी पदोन्नतीच्या संधी उपलब्ध नाहीत तर काही ठिकाणी अशा संधी उपलब्ध असल्यातरी पदोन्नती मिळण्यास प्रदिर्घ कालावधी लागतो. त्यामुळे आलेली कुंठीतता घालविण्यासाठी दिनांक १ ऑक्टोबर ,१९९४ पासून कालबध्द पदोन्नती योजना लागू करण्यात आली. सदर कर्मचारी वृंदाचे हित लक्षात घेवून संदर्भीय शासन निर्णय क्र. २ अन्वये " गट - क " मधील पदधारकांना १२ वर्षाच्या नियमित सेवेनंतर त्यांचे पदोन्नती साखळीतील वरच्या पदावरील वेतनश्रेणी देण्याचा निर्णय शासनाने घेतला आहे. ज्या कर्मचाऱ्यांना पदोन्नती साखळीतील पदावर पदोन्नतीसाठी पद अस्तित्वात नाही अशा कर्मचाऱ्यांना देखील शासन निर्णय दि. ८/४/१९९५ सोबतच्या परिशिष्ठात दर्शविल्यानुसार वरिष्ठ वेतनश्रेणी देण्यात आली आहे.

तसेच संदर्भात नमुद केलेल्या शासन निर्णयातील तरतूदीनुसार समाज कल्याण आयुक्तालयाच्या आस्थापनेवरील "गट - क" संवर्गातील समाज कल्याण निरीक्षक /सेवानिवृत्त समाज कल्याण निरीक्षक यांना सतत व नियमित १२ वर्षे व पहिल्या लाभानंतरची १२ वर्षे सेवा पुर्ण झालेल्या कर्मचाऱ्यांना " **प्रथम कालबध्द /**

स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव

महाराष्ट्र शासन

**समाज कल्याण आयुक्तालय, ३ चर्च पथ, महाराष्ट्र राज्य, पुणे १**

दूरध्वनी क्र .२०-२६१२२७५२ ईमेल -sakalyanpuneest@gmail.com

**वाचा**

१. वित्त विभाग, शासन निर्णय वेतन-१११९/प्र.क्र.३/२०१९/सेवा-३,दि.२.३.२०१९

२. तीन लाभांच्या सुधारित सेवातंर्गत आश्वासित प्रगती योजना बैठक इतिवृत्त दि.१.११.२०२१

क्र. सकआ/आस्था-१/सकनि/सुआप्रयो/२०२१-२२/का-६/ 1239 पुणे, दिनांक : 12/04/2022

**-: आदेश :-**

उपोदघातातील संदर्भ क्र. १ अन्वये शासन सेवेत " गट - क " संवर्गात काही ठिकाणी पदोन्नतीच्या संधी उपलब्ध नाहीत तर काही ठिकाणी अशा संधी उपलब्ध असल्यातरी पदोन्नती मिळण्यास प्रदिर्घ कालावधी लागतो. त्यामुळे आलेली कुंठीतता घालविण्यासाठी संदर्भ क्र.२ अन्वये पार पडलेल्या पदोन्नती समितीच्या बैठकीतील निर्देशानुसार ज्यांची कागदपत्रे अप्राप्त होती. अशा संबंधितांना कागदपत्रे सादर करण्याची संधी देवून खालील नमूद केलेल्या समाज कल्याण निरीक्षकांची १०, २० व ३० वर्षाच्या नियमित सेवेनंतरची तीन लाभांची सुधारित सेवांतर्गत आश्वासित प्रगती योजनेचा लाभ मिळणेबाबत कागदपत्रे प्राप्त झाल्यानुसार दिनांक ०१ जानेवारी २०१६ पासून लागू केलेली आहे. त्यानुसार पात्र ठरलेल्या समाज कल्याण निरीक्षकांना यांना सुधारित सेवांतर्गत आश्वासित प्रगती योजनेचा लाभ मंजूर करण्यात आलेला आहे. खालील नमूद समाज कल्याण निरीक्षकांना १२ + ८ = २० व २४+६=३० नुसार अनुज्ञेय ठरत असलेल्या सुधारित सेवांतर्गत आश्वासित प्रगती योजनेचा लाभ " मंजूर करण्यात येत आहे.

**<u>समाज कल्याण निरीक्षक या संवर्गात २० (१२+८) वर्षाच्या नियमित सेवेनंतर दुसऱ्या लाभास पात्र ७ व्या वेतन आयोगानुसार विद्यमान वेतनबॅन्ड एस १४ (रु.३८६००-१२२८००) लाभाच्या दिनांकापासून अनुज्ञेय असलेली वरिष्ठ वेतनबॅन्ड एस १५ (रु. ४१८००-१३२३००)</u>**

| अ. क्र | कर्मचाऱ्यांचे नाव | सेवेत रुजू झाल्याचा दिनांक | या संवर्गात आल्याचा दिनांक | प्रथम कालबध्द पदोन्नती अनुज्ञेय लाभाचा दिनांक | दुसरी कालबध्द पदोन्नती अनुज्ञेय लाभाचा दिनांक | शा.नि.दि.२ मार्च, २०१९ नुसार प्रत्यक्ष दुसऱ्या लाभाचा अनुज्ञेय दिनांक |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | श्री.जी.के.आंबोरे | १७.७.१९९६ | ०२.०६.२००६ | १७.७.२००८ | १७.७.२०१६ | १७.७.२०१६ |

**समाज कल्याण निरीक्षक या संवर्गात ३० (२४+६) वर्षाच्या नियमित सेवेनंतर तिसऱ्या लाभास पात्र ७ व्या वेतन आयोगानुसार विद्यमान वेतनबॅन्ड एस १५ (रु४१८००-१३२३००) लाभाच्या दिनांकापासून अनुज्ञेय असलेली वरिष्ठ वेतनबॅन्ड एस १८ (रु. ४९१००-१५५८००)**

| अ. क्र | कर्मचाऱ्यांचे नाव | सेवेत रुजू झाल्याचा दिनांक | या संवर्गात आल्याचा दिनांक | प्रथम कालबध्द पदोन्नती अनुज्ञेय लाभाचा दिनांक | दुसरी कालबध्द पदोन्नती अनुज्ञेय लाभाचा दिनांक | ७ वे वेतन आयोगानुसार (२४+६ ) लाभाचा दिनांक | शा.नि.दि. २ मार्च, २०१९ नुसार प्रत्यक्ष तिसऱ्या लाभाचा अनुज्ञेय दिनांक |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | श्री.पी.एस. सोनवणे | १०.४.१९७९ | ०१.०६.२००६ | १.१०.१९९४ | १.१०.२००६ | १.१०.२०१२ | १.०१.२०१६ |
| २ | श्री.पी.एस. गुजर | १७.११.१९८१ | ०१.०६.२००६ | १.१०.१९९४ | १.१०.२००६ | १.१०.२०१२ | १.०१.२०१६ |

**उपरोक्त नमुद** समाज कल्याण निरीक्षकांना **/सेवानिवृत्त** समाज कल्याण निरीक्षकांना **यांना देण्यात येणारी पदोन्नतीच्या पदाची वेतनसंरचना खालील अटींच्या अधीन राहून देण्यात येत आहे.**

**<u>योजनेचा तपशिल</u>**

१. सातव्या वेतन आयोगामधील तीन लाभांची सुधारित सेवांतर्गत आश्वासित प्रगती योजना ही वेतन मॅट्रिक्समधील वेतनस्तर एस-२० पर्यंत वेतन घेणाऱ्या (सहाव्या वेतन आयोगातील पे बँड रु.१५६००-३९१०० व ग्रेड पे.रु.५४००/-या वेतन संरचनेशी समकक्ष) कर्मचारी/अधिकारी यांनी लागू राहील.संबंधित कर्मचारी/अधिकारी हे कोणत्याही कारणामुळे वेतनस्तर एस-२१ मध्ये वेतन आहरित करु लागतील. तेव्हा त्यांना उपरोक्त नवीन योजनेअंतर्गत लाभ अनुज्ञेय राहणार नाही.

२. या योजनेखाली पात्र कर्मचारी / अधिकारी यांना **संपूर्ण सेवा कालावधीत, पात्रतेनुसार तीन वेळा, या योजनेचा लाभ मंजूर करण्यात येईल.** मात्र, ज्या कर्मचारी / अधिकारी यांना दोन कार्यात्मक पदोन्नत्या मिळाल्या आहेत, त्यांना या योजनेखाली फक्त एकच लाभ अनुज्ञेय होईल. थोडक्यात संबंधित कर्मचारी / अधिकारी यांना एकाच पदोन्नती साखळीतील पदावर मिळून त्यांची एकूण नियमित व सलग सेवा ३० वर्षे असल्यास, या ३० वर्षाच्या कालावधीत झालेल्या कार्यात्मक पदोन्नती व लाभ यांची संख्या,

किमान तीन असावी. त्याशिवाय ज्या कर्मचारी / अधिकारी यांना तीन कार्यात्मक पदोन्नत्या मिळाल्या आहेत, त्यांना या योजनेअंतर्गत एकही लाभ अनुज्ञेय ठरणार नाही.

३. या योजनेअंतर्गत एकाच पदोन्नती साखळीतील पदावर मिळून झालेल्या संपूर्ण सेवा कालावधीत, संबंधितास सुरुवातीस लाभ मंजूर झाला असल्यास व तदनंतर लाभाच्या वेतनश्रेणीत त्याची कार्यात्मक पदोन्नती झाल्यास, पुन्हा वेतननिश्चितीचा लाभ अनुज्ञेय नसल्याने, अशा पदोन्नतीची गणना एकूण तीन कार्यात्मक पदोन्नतीच्या संख्येमध्ये करण्यात येणार नाही.

४. **या तीन लाभाच्या योजनेच्या लाभार्थीस, पदोन्नतीच्या पदाकरीता विहीत केलेली अर्हता, ज्येष्ठता, पात्रता, अर्हता परीक्षा, विभागीय परीक्षा उत्तीर्ण असणे, गोपनीय अहवालाची प्रतवारी, विभागीय चौकशी व न्यायिक प्रकरण प्रलंबित नसणे. (शासन निर्णय सा.प्र.वि.दि.१५.१२.२०१७ नुसार), यथास्थिती जातीवैधता प्रमाणपत्र उपलब्ध असणे, अशा पदोन्नतीच्या कार्यपध्दतीची, विभागीय पदोन्नती समितीच्या बैठकीत पूर्तता करणे आवश्यक आहे.**

५. तीन लाभांच्या योजनेचा पहिला व दुसरा लाभ - ज्या कर्मचारी / अधिकारी यांनी यापूर्वी अनुज्ञेयतेनुसार यथास्थिती कालबध्द पदोन्नती योजना अथवा सेवांतर्गत आश्वासित प्रगती योजना व सुधारित सेवांतर्गत आश्वासित प्रगती योजनेचा पहिला व दुसरा लाभ यापूर्वी घेतलेला आहे, त्यांचे सदर लाभ हे तीन लाभाच्या योजनेखालील प्रकरणपरत्वे पहिला वा दुसरा लाभ समजण्यात येईल.

६. विवक्षित सेवा कालावधीनंतर (After specified number of years of service),संबंधित पदाच्या कर्तव्ये व जबाबदारीत वाढ न होता, अकार्यात्मक वा तत्सम उच्च वेतन संरचनेचा ( Non-Functional Pay Structure) मंजूर करण्यात आलेला / येणारा, लाभ, हा या योजनेखालील पहिला लाभ (First benefit of MACPS) समजण्यात येईल. उदा. मंत्रालय / विधानमंडळ सचिवालय कक्ष अधिकाऱ्यांना चार वर्षांच्या नियमित सेवेनंतर देण्यात येत असलेली अकार्यात्मक वेतनसंरचना.

ज्या कर्मचारी / अधिकारी यांना पहिला लाभ म्हणून ज्या पदाची वेतनसंरचना मंजूर करण्यात आली आहे, त्या पदाला विवक्षित सेवा कालावधीनंतर, त्या पदाच्या कर्तव्ये व जबाबदाऱ्यांमध्ये वाढ न होता, अकार्यात्मक व तत्सम उच्च वेतनसंरचना मंजूर करण्यात येत असेल तर ती अकार्यात्मक वा तत्सम उच्च वेतन संरचना हा दुसरा लाभ (Second benefit of MACPS) म्हणून मंजूर करण्यात येईल.

७. पूर्वी १२ व २४ वर्षांच्या सेवेनंतर मिळणारे लाभ, सातव्या वेतन आयोगात १०, २० व ३० वर्षांच्या सेवेनंतर पात्रतेनुसार अनुज्ञेय केले आहेत. त्यामुळे ज्या कर्मचारी / अधिकारी यांना दि.०१.०१.२०१६ पूर्वी अनुज्ञेयतेनुसार यथास्थिती पहिला वा दुसरा लाभ मंजूर झाला आहे. अशा कर्मचारी / अधिकारी यांना उर्वरित यथास्थिती दुसरा व तिसरा लाभ १२ + ८ व २४ + ६ प्रमाणे पात्रतेनुसार, अनुज्ञेय राहील.

८. ज्या कर्मचाऱ्यास दि. ०१.०१.२०१६ ते या शासन निर्णयाच्या दिनांकापर्यंत यथास्थिती १२ वा २४ वर्षांच्या सेवेनंतर पदोन्नतीच्या साखळीतील पदावर पहिला अथवा दुसरा लाभ मंजूर झाला आहे, त्यांना

२० (१२+८) व ३० (२४+६) एवढया वर्षाच्या नियमित सेवेनंतर, पात्रतेनुसार,यथास्थिती दुसरा व तिसरा लाभ मंजूर करण्यात यावा.

दि. ०१.०१.२०१६ ते सातव्या वेतन आयोगानुसार सुधारीत सेवांतर्गत प्रगती योजनेचा लाभ अनुज्ञेय करण्याबाबतचे आदेश, निर्गमित होण्याच्या तारखेपर्यंत ज्यांना, शासन निर्णय वित्त विभाग दि. ०१.०४.२०१० नुसार सुधारीत सेवांतर्गत आश्वासित प्रगती योजनेचा यथास्थिती पहिला वा दुसरा लाभ मंजूर करण्यात आला आहे, अशा कर्मचारी / अधिकारी यांचे असुधारीत लाभाचे, यापूर्वीचे आदेश रद्द करुन त्यांना तीन लाभाच्या योजनेनुसार सातव्या वेतन आयोगाच्या वेतन मॅट्रीक्सनुसार, पदोन्नतीच्या पदाच्या सातव्या वेतन आयोगाच्या वेतनश्रेणीत, सदर लाभ सुधारीतरित्या मंजूर करण्यात येतील. त्या अनुषंगाने असुधारीत लाभाची रक्कम, सुधारीत लाभाच्या रकमेशी समायोजित करुन, फरकाची रक्कम संबंधितांना अनुज्ञेय करण्यात यावी.

९. ज्या कर्मचारी / अधिकारी यांच्या नियमित सेवेची १० वर्षे दिनांक ३१.१२.२०१५ पूर्वी किंवा दि. ३१.१२.२०१५ रोजी पूर्ण होतील, त्यांना तीन लाभाच्या योजनेअंतर्गत पहिला लाभ हा दि. ०१.०१.२०१६ रोजी पात्रतेनुसार अनुज्ञेय होईल.

ज्या कर्मचारी / अधिकारी यांना यापूर्वीच्या योजनेनुसार पदोन्नतीच्या साखळीतील पदावर दि.०१.०१.२०१६ पूर्वीच पहिला लाभ मंजूर केला आहे. अशा कर्मचाऱ्यांना त्यांची १२+८ अशी २० वर्षाची सेवा, ही दि. ०१.०१.२०१६ पूर्वी पूर्ण होत असल्यास, संबंधितास दुसरा लाभ (Second benefit on promotional post) दि. ०१.०१.२०१६ पासून पात्रतेनुसार अनुज्ञेय ठरेल.

ज्या कर्मचारी / अधिकारी यांची २० वर्षाची सेवा ही ०१.०१.२०१६ रोजी व नंतरच्या तारखेस पूर्ण होईल, त्यांना, तिसरा लाभ हा दुसऱ्या लाभापासून १० वर्षानंतर पदोन्नतीच्या साखळीतील पदावर (Third benefit on promotional post) अनुज्ञेयतेनुसार व पात्रतेनुसार मंजूर करण्यात येईल.

१०. ज्या कर्मचारी / अधिकारी यांना यापूर्वीच्या योजनेनुसार दि. ०१.०१.२०१६ पूर्वीच पदोन्नतीच्या साखळीतील पदावर दुसरा लाभ मंजूर केला आहे, अशा कर्मचाऱ्यांना त्यांची २४+६ अशी ३० वर्षाची सेवा, ही दि. ०१.०१.२०१६ पूर्वी पूर्ण होत असल्यास, संबंधितास तिसरा लाभ दि.०१.०१.२०१६ पासून पात्रतेनुसार अनुज्ञेय करण्यात यावा. तसेच ज्यांची तिसऱ्या लाभाच्या अनुज्ञेयतेसाठी ३० वर्षाची सेवा ही दि. ०१.०१.२०१६ रोजी व नंतरच्या तारखेस पूर्ण होत असल्यास, त्यांना संबंधित तारखेस पात्रतेनुसार, तिसरा लाभ अनुज्ञेय करण्यात यावा.

११. दि. १ जानेवारी, २०१६ व त्यानंतरच्या पदोन्नतीच्या वेळी, म.ना.से (सुधारित वेतन) नियम, २०१९ या अधिसुचनेतील नियम क्रमांक १३ नुसार वेतननिश्चितीचा लाभ अनुज्ञेय केला जाणार असल्यामुळे त्याच तरतुदीनुसार पदोन्नतीच्या साखळीतील पदावरील पदधारकास नवीन योजनेमध्ये वेतन निश्चितीचा लाभ अनुज्ञेय केला जाणार असल्यामुळे त्याच तरतुदीनुसार पदोन्नतीच्या साखळीतील पदावरील पदधारकास नवीन योजनेमध्ये वेतननिश्चितीचा लाभ अनुज्ञेय राहील.

१२. एकाकी पदावरील कर्मचारी / अधिकारी यांना यापूर्वीच्या योजनेनुसार दि. ०१.०१.२०१६ पूर्वीच पहिला लाभ मंजूर केला आहे. अशा कर्मचाऱ्यांना त्यांची २० (१२ + ८) वर्षाची सेवा ही दि. ०१.०१.२०१६ पूर्वी पूर्ण होत असल्यास, संबंधितास दुसरा लाभ हा सोबत जोडलेल्या परिशिष्टात दर्शविल्यानुसार वेतन मॅट्रीक्समधील नजिकच्या वेतनस्तरामध्ये (Immediate Next Level) दि. ०१.०१.२०१६ पासून पात्रतेनुसार अनुज्ञेय ठरेल.

१३. दि. ०१.०१.२०१९ पूर्वी शासन सेवेत पदोन्नतीच्या साखळीतील पदावर कार्यरत अधिकारी / कर्मचारी यांना दि. ०१.०१.२०१९ रोजी व नंतर तीन लाभाच्या योजनेतील यथास्थिती पहिला, दुसरा व तिसरा लाभ हा पात्रतेनुसार, सातव्या वेतन आयोगाच्या वेतनमॅट्रीक्समध्ये पदोन्नतीच्या पदाच्या वेतनश्रेणीत अनुज्ञेय राहील.

१४. सातव्या वेतन आयोगानुसार वेतनश्रेणीतील सुधारणा तसेच तीन लाभांची सुधारीत सेवांतर्गत आश्वासित प्रगती योजना ही दि.०१.०१.२०१६ पासून लागू करण्यात आली आहे. त्यामुळे जे कर्मचारी व अधिकारी हे पूर्वीच्या योजनानुसार यथास्थिती पहिला व दुसरा लाभ घेऊन दि. ०१.०१.२०१६ पूर्वीच शासन सेवेतून सेवानिवृत्त झाले आहेत / मृत्यु पावले आहेत, त्यांना यथास्थिती १२ + ८ व २४ + ६ याप्रमाणे सुधारीत सेवांतर्गत आश्वासित प्रगती योजनेचा लाभ अनुज्ञेय ठरणार नाही.

तथापि ज्या कर्मचारी / अधिकारी यांना कालबध्द पदोन्नती / सेवांतर्गत आश्वासित प्रगती योजना / सुधारीत सेवांतर्गत आश्वासित प्रगती योजना, यांचा यथास्थिती पहिला वा दुसरा लाभ हा दि. ३१.१२.२०१५ पूर्वी प्राप्त होऊन ते दि. ०१.०१.२०१६ रोजी वा नंतरच्या तारखेस सेवानिवृत्त झाले आहेत / मृत्यु पावले आहेत, अशा कर्मचारी / अधिकारी यांच्या लाभाच्या तारखेपासून यथास्थिती ८ वर्षाची सेवा तसेच ६ वर्षाची सेवा ही त्यांच्या निवृत्तीच्या तारखेस / मृत्युच्या तारखेस पूर्ण होत आहे, अशा कर्मचारी / अधिकारी यांना अनुज्ञेयतेनुसार व पात्रतेनुसार यथास्थिती दुसरा वा तिसरा लाभ अनुज्ञेय करण्यात यावा.

१५. एकाकी अथवा एकाकी संवर्गातील पदावर कार्यरत ज्या शासकीय कर्मचारी, जिल्हा परिषदेचे शिक्षकेत्तर कर्मचारी, यांना दि. ०१.०१.२०१६ ते या शासन निर्णयाच्या दिनांकापर्यंत यथास्थिती १२ वा २४ वर्षाच्या सेवेनंतर पहिला व दुसरा लाभ मंजूर झाला आहे, त्यांना २० (१२ + ८) व ३० (२४ + ६) एवढया वर्षाच्या सेवेनंतर पात्रतेनुसार यथास्थिती दुसरा वा तिसरा लाभ सोबत जोडलेल्या परिशिष्टात दर्शविल्यानुसार वेतन मॅट्रीक्समधील नजिकच्या वेतनस्तरामध्ये (Immediate Next Level) मंजूर करण्यात यावा.

१६. एकाकी अथवा एकाकी संवर्गातील पदावर कार्यरत राज्य शासकीय कर्मचारी, जिल्हा परिषदेचे शिक्षकेतर कर्मचारी, यांना दि. ०१.०१.२०१६ ते सातव्या वेतन आयोगानुसार तीन लाभांची सुधारीत सेवांतर्गत आश्वासित प्रगती योजनेचा लाभ अनुज्ञेय करण्याबाबतचे आदेश निर्गमित होण्याच्या तारखेपर्यंत ज्यांना शासन निर्णय वित्त विभाग दि. ०५.०७.२०१० नुसार यथास्थिती पहिला व दुसरा लाभ मंजूर केला आहे, त्याबाबतचे आदेश रद्द करुन, सर्व संबंधितास, सातव्या वेतन आयोगाच्या वेतन

मॅट्रीक्सनुसार, सोबत जोडलेल्या परिशिष्टात दर्शविल्यानुसार, सदर लाभ सुधारीतरित्या मंजूर करण्यात येतील. त्या अनुषंगाने असुधारीत लाभाची रक्कम, सुधारीत लाभाच्या रकमेशी समायोजित करुन फरकाची रक्कम संबंधिताना अनुज्ञेय करण्यात यावी.

१७. दि. ०१.०१.२०१९ रोजी व नंतर शासन सेवेत पदोन्नतीच्या साखळीतील पदावर अथवा एकाकी पदावर किंवा एकाकी संवर्गावर, सरळसेवा प्रवेशाने नियुक्त होणाऱ्या कर्मचारी / अधिकारी यांना यथास्थिती १०,२० व ३० वर्षाच्या नियमित सेवेनंतर,सोबत जोडलेल्या परिशिष्टामध्ये दर्शविल्यानुसार, वेतन मॅट्रीक्समधील विद्यमान वेतनस्तर विचारात घेऊन, नजिकच्या वेतनस्तरामध्ये (Immediate next level) यथास्थिती पहिला, दुसरा व तिसरा लाभ, हे पात्रतेनुसार अनुज्ञेय ठरतील.

१८. वरील सर्व प्रसंगांमध्ये वेतनमॅट्रीक्समधील एस -२० या वेतनस्तरामध्ये वेतन आहरित करेपर्यंत, संबंधित अधिकारी यांस यथास्थिती पहिला वा दुसरा वा तिसरा लाभ अनुज्ञेय ठरेल. पहिला वा दुसरा वा तिसरा लाभ घेतल्यामुळे, संबंधित अधिकारी / कर्मचारी यांना एस -२१ हा वेतनस्तर लागू झाला कि, त्यास त्यापुढील लाभ अनुज्ञेय राहणार नाही.

१९. संबंधित कर्मचारी / अधिकाऱ्यास, तीन लाभाच्या योजनेअंतर्गत पहिल्या वा दुसऱ्या वा तिसऱ्या लाभाच्या अनुज्ञेयतेसाठी, गोपनीय अहवाल प्रतवारीच्या सरासराचा निकष हा निकटच्या पदोन्नतीच्या पदासाठी सामान्य प्रशासन विभागाने विहीत केल्यानुसार राहील. तसेच वर्ग - ४ मधील कर्मचारी व मागासवर्गीय कर्मचारी यांच्या पदोन्नतीकरीता सामान्य प्रशासन विभागाने विहीत केलेले आदेश तसेच धोरण विचारात घेऊन संबंधितांची या योजनेअंतर्गत लाभासाठी पात्रता तपासण्यात येईल.

२०. या योजनेचा पहिला अथवा दुसरा लाभ मिळाल्यानंतर कर्मचाऱ्यास पदोन्नतीच्या पदावर प्रत्यक्ष पदोन्नती मिळाली असेल व त्यानंतर पदोन्नती साखळीत पुढील पदोन्नतीचा संवर्ग उपलब्ध नसेल तर, तो ज्या पदाच्या वेतनसंरचनेत वेतन घेत आहे ते पद जणूकाही एकाकी पद आहे असे समजून संबंधित

कर्मचाऱ्यास त्यांचा वेतनमॅट्रीक्समधील, विद्यमान वेतनस्तर विचारात घेऊन, नजिकच्या वेतनस्तरामध्ये अनुज्ञेय लाभ, पात्रतेनुसार मंजूर करण्यात येईल.

२. कार्यात्मक पदोन्नती नाकारली आहे अशा अथवा कार्यात्मक पदोन्नतीस अपात्र ठरलेल्या कर्मचारी अधिकारी यांस भविष्यात होणाऱ्या/ झालेल्या विभागीय पदोन्नती समितीच्या बैठकीत, कार्यात्मक पदोन्नतीस पात्र ठरल्यास त्यास कार्यात्मक पदोन्नतीचा कार्यभार स्वीकारल्याच्या दिनांकापासून १० वर्षाच्या नियमित सेवेनंतर, अन्य विहीत अटी व शर्तीच्या पूर्ततेनंतर, या योजनेअंतर्गत यथास्थिती पहिला / दुसरा /तिसरा लाभ पात्रतेनुसार मंजूर करण्यात येईल.

३. या योजनेखाली पहिला , दुसरा व तिसरा अथवा तिन्ही लाभ मंजूर केल्यानंतर प्रत्यक्ष पदोन्नती नाकारलेल्या अथवा पदोन्नतीस अपात्र ठरलेल्या कर्मचाऱ्यांना देण्यात आलेले लाभ काढून घेण्यात येतील, तथापि अशा लाभांची वसूली करण्यात येणार नाही. तसेच असे लाभ काढून घेतल्यानंतर संबंधिताची वेतननिश्चिती ही त्यांना जणू काही या योजनेचे लाभ देण्यात आले नव्हते असे समजून,

महाराष्ट्र नागरी सेवा (वेतन) नियम, १९८१ मधील नियम १२ च्या तरतुदीनुसार करण्यात येईल. असे नमूद आहे.

आदेशामध्ये देय ठरत असलेल्या लाभाच्या दिनांकाबाबत नियंत्रण अधिकारी यांनी खातरजमा करावी. तसेच संबंधित सहाय्यक आयुक्त समाज कल्याण यांनी आदेशात नमूद केलेल्या गृहपालांकडून जात वैधता प्रमाणपत्र व मत्ता व दायित्व प्राप्त झाल्यानंतरच वेतननिश्चिती व तत्सम लाभ नियमानुसार मंजूर करण्याची कार्यवाही करण्यात यावी. तसेच केलेल्या कार्यवाहीचा अहवाल विनाविलंब आयुक्तलयास सादर करावा. याबाबत भविष्यात काही अडचणी उद्भवल्यास यास सर्वस्वी आपणांस जबाबदार धरण्यात येईल.

विभागीय चौकशी प्रलंबित / प्रस्तावित असल्यास अंतिम निर्णयाच्या अधिन राहून / भविष्यात पदोन्नती समितीने त्यांच्या पदोन्नतीची हक्क डावल्यास निर्णयाच्या अधिन राहून त्यांना वरिष्ठ वेतनश्रेणीचा लाभ अनुज्ञेय राहणार नाही. त्यानुसार संबधीत कार्यालय प्रमुख यांना आदेशित करण्यात येईल.

12.4.2022

**(डॉ.प्रशांत नारनवरे)**
**आयुक्त, समाज कल्याण,**
**महाराष्ट्र राज्य, पुणे.**

**प्रत माहितीस्तव सविनय सादर.**

१. मा. अपरमुख्य सचिव, सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग, मंत्रालय, मुंबई.

२. मा. महालेखापाल, मुंबई / नागपूर (सस्नेह)

**प्रत :- माहिती तथा पुढील योग्य त्या कार्यवाहीस्तव.**

१. प्रादेशिक उपायुक्त, समाज कल्याण विभाग ,संबधित

२. सहाय्यक आयुक्त, समाज कल्याण, संबंधित.

३. कोषागार अधिकारी/उपकोषागार अधिकारी संबंधित /लेखा व अधिदान अधिकारी बांद्रा

४. संबधित कर्मचारी.

12.4.2022

**आयुक्त, समाज कल्याण,**
**महाराष्ट्र राज्य, पुणे.**